सत्यमेव जयते

अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

महाराष्ट्र शासन
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
कार्यालय - कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२१६
फॅक्स क्र. ०२४२६ - २४३८१६
ई-मेल registrar.mpkv@nic.in

पत्ता : - मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,
जिल्हा - अहिल्यानगर. पिन - ४१३ ७२२.

जा.क्र.प्रशासन/शाखा-ब/प्रकल्पग्रस्त/प्रमाणपत्र/पावती/मुदत/१०८५/२०२५ दिनांक ११ /०६/ २०२५

## जाहीर सुचना

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर, कार्यक्षेत्रातील (अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर) ज्या प्रकल्पग्रस्तांच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या प्रकल्पाकरिता प्रत्यक्षात जमिनी संपादित झालेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील उमेदवारांना सरळसेवेने रिक्त पदांवर भरती करण्याकरिता शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ नुसार विद्यापीठा मार्फत दिनांक ३१.१२.२०२४ रोजी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तासाठी पदभरती करणेकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरील जाहिराती अन्वये विविध पदांकरिता अर्ज करणेसाठी दिनांक ३०.०१.२०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. तद्नंतर विविध प्रकल्पग्रस्त संघटना यांनी या कार्यालयास निवेदन सादर करुन अर्ज सादर करणेबाबत मुदतवाढ देणेबाबत विनंती केल्याने अर्ज सादर करणेबाबत प्रथमतः दिनांक २८.०२.२०२५ व तद्नंतर २४.०३.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास (दि.२४.०३.२०२५) किंवा त्यापूर्वी काही विद्यापीठ प्रकल्पग्रस्त यांना मुदतीत प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र न मिळाल्याने अशा प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालयास प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज सादर केलेबाबतची पोहोच पावती त्यांचे अर्जासोबत सादर केली आहे.

मा. कुलगुरु यांचे मान्यतेने ज्या उमेदवारांनी दिनांक २४.०३.२०२५ या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी अर्ज सादर केलेले आहेत व सदर अर्ज सादर करतेवेळी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र जोडण्याऐवजी संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी, यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळणेबाबतची पोहोच पावती जोडली आहे, अशा उमेदवारांना **दिनांकः ३०.०६.२०२५ पर्यंत** प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करण्याची संधी देण्यात येत आहे. संबंधित उमेदवार यांनी कार्यालयीन वेळेत कुलसचिव, म.फु.कृ.वि., राहुरी यांच्या नावे प्रकल्पग्रस्त पदभरती दरम्यान ज्या पदांसाठी अर्ज सादर केले असतील त्या पदांचा नामोल्लेख करुन स्वतंत्र अर्जासोबत सदरचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

दिनांक ३०.०६.२०२५ नंतर प्राप्त झालेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राचा कोणताही विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे, टपालाने विलंब झाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. असे प्राप्त झालेले अर्ज व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र अपात्र ठरविण्यात येतील, याची संबंधित विद्यापीठ प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी नोंद घ्यावी.

11.06.2025

(राजेंद्रकुमार पाटील)
कुलसचिव